★★ पुणे, शुक्रवार, ३ जून २०१६ । किंमत ₹ ४

सकाळ

अवतीभवती



**पौड (ता. मुळशी) : शिबिरात सहभागी झालेले कातकरी समाजातील विद्यार्थी.**

# कातकरी समाजातील विद्यार्थ्यांसाठी पौड येथे प्रशिक्षण शिबिर

पौड, ता. २ : क्विक हिल फाउंडेशनच्या दिशा केंद्राच्या वतीने पौड (ता. मुळशी) येथे कातकरी समाजातील चौथी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पौड, बेलावडे, आंदेशे, सुतारवाडी, गडदावणे या पाच गावांतील पन्नास विद्यार्थी सहभागी झाले होते. पौडच्या इंदिरानगरमधील कातकरी वस्तीतील सभागृहात हे शिबिर पार पडले. त्यात श्री योग वेदांत सेवा समितीचे विशाल वेळे, श्रीकांत भाई, सुभाष माकर यांनी विद्यार्थ्यांना योगासने, प्राणायाम शिकविले. स्मरणशक्तीचा विकास कसा होईल याबाबतची माहिती दिली. संत महापुरुषांचे महान विचार मुलांना ऐकविण्यात आले. त्याचप्रमाणे विविध प्रकारचे बैठे खेळही शिकविण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी सचिन आकरे आणि बाळू कातकर यांनी परिश्रम घेतले.